शुध्दीपत्रक

जा.क्र.कृआ./विप्र-२/एन.एम.ओओपी/प्र.क्र. १/ ३६९ / २०१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
दिनांक २० सप्टेंबर २०१४.

प्रति,

१ विभागीय कृषि सह संचालक (सर्व संबंधित)
२ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व संबंधित)

**विषय - राष्ट्रीय गळीतधान्य व तेलताड अभियान (एनएमओओपी) सन २०१४-१५ अंतर्गत मार्गदर्शक सुचनामधील सुधारीत बदलाबाबत.....**

संदर्भ :- १) अभियानाच्या मार्गदर्शक सुचना क्र. २२९ दि. ०९/०६/२०१४
२) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक १-५/२०१३/ओएस- (टिएमओपी) दिनांक ९ सप्टेंबर २०१४.
३) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक २-१२/२०१४/एमएम-१(ओएस) दिनांक ११ सप्टेंबर २०१४.
४) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक १-६/२०१३/ओएस- (टिएमओपी) दिनांक १२ सप्टेंबर २०१४.
५) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक १-६/२०१३/ओएस- (टिएमओपी) दिनांक १२ सप्टेंबर २०१४.

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानांतर्गत उप अभियान क्र. १ (गळीतधान्य) व उपअभियान क्र. ३ (वृक्षजन्य तेलबिया) साठी सविस्तर मार्गदर्शक सुचना आपणांस परिपत्रित करण्यात आलेल्या आहेत.

तथापी केंद्र शासनाने संदर्भिय पत्र क्र. २ ते ५ अन्वये अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये खालीलप्रमाणे अंशतः बदल केलेले आहेत.

| अ. क्र. | मा.सु.मधील मुद्दा क्र. व पेज क्र. | मार्गदर्शक सुचनाप्रमाणे | सुधारीत मार्गदर्शक सुचना |
|---|---|---|---|
| १ | ४) प्रमाणित बियाणे वाटप (पृ.क्र.१२) | गळीतधान्य पिकाच्या १० वर्षाच्या आतील अधिसूचीत सुधारीत वाणांसाठी किंमतीच्या ५० टक्के रु. १२००/- प्रति क्विंटल मर्यादेत तर १० वर्षाच्या आतील अधिसूचीत संकरीत वाणांसाठी किंमतीच्या ५० टक्के रु. २५००/- प्रति क्विंटल मर्यादेत अनुदान अनुज्ञेय आहे. | अभियानाअंतर्गत खरीप हंगाम २०१४ मध्ये दुष्काळग्रस्त / टंचाईग्रस्त जिल्ह्यातील शेतक-यांना गळीतधान्य प्रमाणित बियाणे वितरण हे खालीलप्रमाणे सुधारीत अनुदानाचे दरानुसार करण्यात यावे.<br>सुधारीत वाणां-साठी: किंमतीच्या ५० टक्के रु. १८०० प्रति क्विंटल मर्यादेत<br>संकरीत वाणां-साठी: किंमतीच्या ५० टक्के रु. ३७५० प्रति क्विंटल मर्यादेत<br>सदरील वाढीव अनुदान हे ३१ मार्च २०१५ पर्यंत लागु राहील. |

| अ. क्र. | मा.सु.मधील मुद्दा क्र. व पेज क्र. | मार्गदर्शक सुचनाप्रमाणे | सुधारीत मार्गदर्शक सुचना |
|---|---|---|---|
| २ | ६) जिप्समचे वाटप / पायराईट / डोलोमाईट / सिंगल सुपर फॉस्फेट (पृ.क्र.२३) | जिप्सम/पायराईट्स/ डोलोमाईट/ सल्फर ८० टक्के डब्लुडीजी या निविष्ठाच्या किंमतीच्या ५० टक्के अधिक वाहतूक खर्च १०० टक्के एकुण रु. ७५०/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल त्या अनुदान मर्यादेत शेतक-यांना लाभ देण्यात यावा. | अभियानाअंतर्गत मार्गदर्शक सुचनामधील सल्फर ८० टक्के वगळण्यात येत असुन त्या ऐवजी सल्फर ९० टक्के पावडर (एफसीओ ग्रेड) चा समावेश करण्यात आलेला आहे. जिप्सम / पायराईट्स/ डोलोमाईट/ सल्फर ९० टक्के पावडर (एफसीओ ग्रेड) या निविष्ठांसाठी प्रती हेक्टरी वाहतुक खर्चासह येणा-या खर्चाच्या ५० टक्के रुपये ७५०/- प्रति हेक्टर मर्यादेत अनुदान तत्वावर शेतक-यांना लाभ देण्यात यावा.. |
| ३ | ११)बियाणे साठवणुक कोठी (पृ.क्र.२६) | शेतक-यांना त्यांच्याकडील बियाण्यांची योग्य प्रकारे साठवणु करता यावी या उद्देशाने अभियानाअंतर्गत २० क्विंटल व १० क्विंटल क्षमतेच्या बियाणे साठवणुक कोठ्यासाठी किंमतीच्या २५ टक्के किंवा अनुक्रमे रु. २०००/- व रु.१०००/- मर्यादेत अनुदान देय राहील. | अभियानाअंतर्गत १ ते १० क्विंटल पर्यंत बियाणे साठवणुकीच्या कोठीसाठी किमतीच्या २५ टक्के रुपये १०००/- मर्यादेत अनुदान देय राहील. |
| ४ | ४)पिक संरक्षण उपकरणे (मनुष्यचलीत फवारणी यंत्र/ नॅपसॅक / तैवान फवारणी यंत्र / प्रकाश सापळे) (पृ.क्र.२२) | अभियानाअंतर्गत १६ लिटर पेक्षा कमी व १६ लिटर पेक्षा जास्त क्षमतेचे नॅपसॅक आणि तैवान फवारणी यंत्रासाठी अनुदान अनुज्ञेय राहील. | अभियानाअंतर्गत ‘नॅपसॅक आणि तैवान फवारणी यंत्रासाठी’ मधील “आणि तैवान” हा शब्द वगळला आहे. |

तरी वरील प्रमाणे सुधारीत मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहुन दिलेल्या आर्थिक व भौतिक मर्यादेमध्ये कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

कृषि संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे -

१. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या., अकोला, यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.
२. . मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या., प्रभादेवी, मुंबई -३२. यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर
३. क्षेत्रिय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, (एन.एस.सी), गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे, यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी....
४. क्षेत्रिय व्यवस्थापक, हिंदुस्थान ईन्सेक्टीसाईड ली. अंबाझरी हिल टॉप, रामनगर, नागपुर, यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.